आझादी का
अमृत महोत्सव

# भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव : संधी आणि आव्हाने



मुख्यसंपादक
प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे

Scanned with CamScanner

# "भारतीय स्वातंत्र्य लढयातील रणरागिणी"

**डॉ. रामहरी चांगदेवराव फाटक**

विभाग प्रमुख इतिहास, कला व विज्ञान महाविद्यालय,गढी

**प्रस्तावना :**

भारत या देशाला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी अनेकांनी आपले बलिदान दिलेले आहे. लहान-थोर सर्व जनता स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आसुसलेली होती. स्वातंत्र्याच्या या आंदोलनामध्ये स्त्रिया देखील मागे नव्हत्या. महिलांनी आपले घरदार, कुटूंब ही जबाबदारी सांभाळत भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये आपला सहभाग नोंदवला. असहकार,सत्याग्रह,ब्रिटिशांना विरोध, विदेशी मालावर बहिष्कार असे विविध उपाय त्यावेळच्या महिलांनी केले.

गांधीजींच्या व्यक्तिमत्वामुळे भारतातील व विदेशांतील अनेक स्त्रिया त्यांच्याकडे आकर्षित झाल्या. राष्ट्राच्या उन्नतीसाठी महात्माजींनी जे अनेक कार्यक्रम हाती घेतले त्या विविध कार्यक्रमात सहकारी म्हणून स्त्रियांना सामील करुन घेतले. गांधीजीकडून प्रेरणा घेऊन अनेक स्त्रिया त्यांच्याकडे आकर्षित झाल्या. राष्ट्राच्या उन्नतीसाठी महात्माजींनी जे अनेक कार्यक्रम हाती घेतले. त्या विविध कार्यक्रमात सहकारी बदलून स्त्रियांना सामील करुन घेतले. गांधीजीकडून प्रेरणा घेऊन अनेक स्त्रिया घराबाहेर पडल्या व स्वातंत्र्य चळवळीमध्ये उतरल्या स्त्रिया या राष्ट्राच्या नागरीक आहेत म्हणून त्यांनीही पुरुषांच्या बरोबरीने स्वातंत्र्य चळवळीध्ये भाग घेतला पाहिजे अशी भूमिका गांधीजींनी मांडली होती.



आज समाजामध्ये स्वातंत्र्यलढयामध्ये गरीब ते गर्भश्रीमंत स्त्रियापर्यंत अनेक प्रकारच्या स्त्रियांनी केलेल्या कामगिरीबद्दल बरेच अज्ञान आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून स्वातंत्र्यलढयात भाग घेणाऱ्या आणि सर्वस्वांचे समर्पण करणाऱ्या या शूर महिलांचा भारताच्या या अमृत महोत्सवी वर्षामध्ये आपण अल्पसा परिचर करुन घेतला पाहिजे. अशाच काही महिलाबद्दल या लेखात आपण जाणून घेऊयात.

**बेगम हजरत महल -** राणी लक्ष्मीबाईचा स्वातंत्र्य लढा जर कोणी चालू ठेवला असेल तर तो अवधच्या बेगम हजरत महलने. तिचा लढा केवळ आपले राज्य वाचावे याकरीताच नव्हता तर ब्रिटिशांनी जे मंदिर आणि मस्जिद उध्वस्त करण्याचे धोरण अवलंबीले होते त्या धोरणासाठी बेगमने विरोध केला आणि आपलं बलिदान दिलं.

**भिकाजी कामा -** या देशातील सर्व धर्माच्या लोकांनी स्वातंत्र्य चळवळीमध्ये आपला सहभाग नोंदवल्याचे आपल्याला त्या वेळच्या इतिहासावरुन लक्षात येते. पारशी धर्मातील स्त्री-पुरुषही या स्वातंत्रयाच्या चळवळीमध्ये मागे नव्हते. पारशी धर्मातीलच एक जण म्हणजे मादाम कामा एका सधन पारशी घरातून आलेल्या या महिलेने आपली सर्व संपत्ती अनाथ मुलींच्या अनाथश्रमासाठी देऊ केली आणि स्त्री-पुरुष समानता यासाठी चळवळ हाती घेतली.

**कित्तूर राणी चन्नम्मा -** कर्नाटकातील कित्तूरमधील राणी चन्नमा हिने इंग्रजांच्या धोरणाविरुध्द आवाज उठवला.. सैन्याने केलेल्या उठावाचे तिने नेतृत्व केले. वयाच्या 33 व्या वर्षी तिने ब्रिटिश फौजेच्या विरुध्द लढा दिला.

**कमलादेवी चट्टोपाध्याय -** ब्रिटिशांनी अटक केलेली पहिली महिला म्हणजे कमलादेवी चटोपाध्याय. कमलादेवी या खऱ्या समाजसुधारक



Scanned with CamScanner

पण समाजसुधारणा करत-करत त्यांनी स्वातंत्र्यलढयातही सहभाग नोंदवला. मुळ त्या नाटकातील एक कलाकार,पण स्वातंत्र्य लढयात त्यांनी मोठ काम केलं. स्त्रियांना स्वावलंबी बनवण्यासाठी अनेक लघुउद्योग त्यांनी सुरु केले. अखिल भारतीय महिला परिषद त्यांनी स्थापन केली. कमलादेवींनी गांधीजीच्या 1930 च्या मिठाच्या सत्यागृहात भाग घेतला होता.

**कॅप्टन लक्ष्मी सहगल –** नेताजींच्या आझाद हिंद फौजेतील स्त्रियांच्या तुकडीचे नेतृत्व कॅप्टन लक्ष्मी सहगल यांनी केले. आझाद हिंद सेनेबरोबर काम करतांना लक्ष्मी सहगल यांनी हेच दाखवून दिलं की, अहिंसक मार्गाने होणारे आंदोलन असो किंवा लढाई करण्याची वेळ येवो महिला कुठेही मागे नाहीत.

**अरुणा आसफअली –** 'द ग्रेट ओल्ड लेडी' म्हणून त्या ओळखल्या जात. भारत छोडो आंदोलनाच्या वेळेस मुंबईमध्ये त्यांनी भारताचा ध्वज हातात घेऊन आंदोलनाचे नेतृत्व केले. ब्रिटिशाविरुध्द आवाज उठवला म्हणून त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगात असतांना कैदांना देण्यात येणाऱ्या वाईट वागणुकीबद्दलही त्यांनी आंदोलन केले.

**कनकलता बरुवा –** कनकलता बरुवा या भारतीय स्वातंत्र्यलढयातील वीरबाला म्हणून ओळखल्या जातात. संपूर्ण भारतभर त्यावेळेस ब्रिटिशांविरुध्द आंदोलन सुरु होते. कनकलता बरुवा या आसाममधल्या. आसाममधून त्यांनी 1942 च्या आंदोलनात भाग घेतला होता. त्या आंदोलनाचे नेतृत्व त्यांनी बारंगबारी येथून केलं. त्यावेळेस त्यांना 'भारत छोडो' च्या घोषणा देत गोहपूर पोलीस स्टेशन समोर आंदोलन करायचे होते आणि तिथे त्यांना तिरंगा फडकवायचा होता. परंतु ब्रिटिशांनी त्यांना मध्येच अडवले. त्या ब्रिटिशांना सांगत होत्या की,



आमचं आंदोलन हे हिंसक नाही तरीदेखील ब्रिटिशांनी त्यांचे काहीही ऐकून घेतले नाही. त्यांच्यावर जोरदार लाठीमार करण्यात आला आणि त्यातच वयाच्या केवळ 18 व्या वर्षी त्यांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले.

**फुलो आणि झानो –** भारतीय स्वातंत्र्यलढयातील बिहार व बंगाल क्षेत्रातील संथाल आदिवासींनी अत्याचारी इंग्रजाविरुध्द उठाव केले. या उठावाचे नेतृत्व फुलो आणि झानो या आदिवासी भगिनींनी आघाडीवर राहून केले. या दोन बहिणींनी एका रात्री "फुलो और झानो इन दोन बहनों को इंग्रजो की शिबीर में जाकर तलवार से 21 सिपाहीओं की हत्या कर दी" अशा या शुर पराक्रम आदिवासी भगिनींनी ब्रिटिशांना हैराण करुन सोडले होते.

**राणी आयडिनल्लू–** नागालॅंडमध्ये जादोनाग यांनी ब्रिटिशाविरुध्द उठाव केले. या उठावात जादोनाग यांना त्यांची बहिण राणी गायडिनल्लूने साथ दिली. ब्रिटिशांनी जादोनांग यांना पकडून फाशीची शिक्षा दिली. यानंतर गायडिनल्लूने उठावाची सुत्रे आपल्या हाती घेऊन सैन्याचे संघटन करुन 4000 पेक्षा जास्त नागा जवानांची गुरेल्ला सेना तयार करुन इंग्रजांवर हल्ले करण्यास सुरुवात केली. राणी गायडिनल्लूने घोषणा केली की, इंग्रज मरतील किंवा आम्ही. परंतु मागे हटणार नाही. इंग्रजांनी गायडिनल्लूला पकडण्यासाठी इनाम घोषित केला व जो पकडून देईल त्यास दहा वर्ष पर्यंत कर माफ केला. 19 जून 1932 मध्ये इंग्रज एजेंट जे.पी. मिल्स यांनी राणी गायडिनल्लूचा शोध घेण्याचे काम सुरु केले व राणीचे फोटो गावागावात लावण्यात आले. राणीला पकडण्यात इंग्रजांना यश आल्यानंतर तिला कोहीमच्या तुरुंगात ठेवण्यात आले. नंतर इंफाळच्या जेलमध्ये बंद करुन आजन्म



Scanned with CamScanner

कारावासाची शिक्षा दिली. तुरुगात गेली तेव्हा राणी फक्त 17 वर्षाची होती. "भारत के इतिहास में सबसे कम उम्रवाली महिला क्रांतीकारी वह रही है." भारताला स्वातंत्र्य् मिळेपर्यंत गायदिनल्लू तुरुंगातच होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तिची सुटका करण्यात आली. पंडित नेहरुंनी त्यांना त्यांच्या स्वातंत्र्याच्या योगदानामुळे नागाराणी ही उपाधी दिली.

**सारांश –**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये अशा काही स्त्रिया आहेत की, त्यांना फारशी प्रसिध्दी मिळाली नाही. परंतु त्यांनी आपले ध्येय सोडले नाही. भारतीय स्वातंत्र्य चळवळीमधील स्त्रियांचे कार्य काहीसे दुर्लक्षित राहिले ते इतिहासपटावर येणे गरजेचे आहे. तसेच आजच्या पिढीसमोर स्त्रियांनी दिलेला स्फुर्तीदायक लढयाचा इतिहास मांडणे आवश्यक आहे. पुरुषांपेक्षा महिलांची स्वातंत्र्य लढयातील भूमिका विशेष महत्वाची आहे. कारण रुढी परंपरांचा तोल ढळू न देता संसाराची जबाबदारी सांभाळत भारतीय स्त्रियांनी हा लढा यशस्वी लढला. हा आधुनिक भारतीय स्त्रियांसाठी स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांनी एक स्फुर्तिदायक असा इतिहासाचा आदर्श घालून दिला आहे.

**संदर्भ :**


1. https://www.inmarathi>14-uns...
2. https://www.weeklysadhana.in>roh...
3. तडवाल शंकर एवं सेनानी लक्ष्मण,आदिवासी विरांगणाएं, प्रकाशक दास ग्रामीण विकास केंद्र, अलीराजपूर, म.प्र.2016
4. सं.पाटील टी.एस.,अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद,27 वे राष्ट्रीय अधिवेशन, संशोधन पत्रिका 2018.
5. एस.एस.गाठाळ, भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.




Dr. Phatak

Principal
Arts, Science & Commerce
College, Shivajinagar Gadhi,
Tq.Georai. Dist.Beed

Scanned with CamScanner